## प्रकरण पहिले

# पार्श्वभूमी

दक्षिण भारतात जी अनेक महत्त्वाची प्राचीन राजघराणी होऊन गेली ; त्या राजघराण्यांमध्ये वाकाटक राजघराणे उल्लेखनीय ठरते. वाकाटक राजघराण्यांने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत म्हणजेच तीनशे वर्ष दक्षिण भारतावर राज्य केले. वाकाटक राजघराण्याची राजधानी विदर्भात नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळील नंदिवर्धन होती. वाकाटक राजघराण्याच्या नंदिवर्धन आणि वत्सगुल्म या दोन शाखा होत्या. नंदिवर्धन ही वाकाटकांची जेष्ठ शाखा असून प्रथम प्रवरसेनाचा पुत्र गौतमीपुत्र आणि गौतमीपुत्राचा पुत्र प्रथम रुद्रसेन याने या शाखेची स्थापना केली. तसेच प्रथम प्रवरसेन याचा दुसरा पुत्र सर्वसेन याने वत्सगुल्म शाखेची स्थापना केली. वत्सगुल्म म्हणजेच आजचे विदर्भातील वाशिम होय. वाशिम हे आज जिल्ह्याचे ठिकाण आहे. वाकाटक राजघराण्यांने विदर्भातून दक्षिण भारताच्या अनेक भूभागावर राज्य केले. दक्षिण भारतातच मराठवाडा हा प्रदेश समाविष्ट होता. वाकाटकांनी संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. या काळात मराठवाड्याची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कला व स्थापत्य क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली. प्रस्तुत शोध प्रबंधात वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि पुरातत्वीय अवशेष, सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थिती आणि कला व स्थापत्याचा आढावा घेतला आहे.

### १.१ विषयाची निवड:

मराठवाड्यावर प्रथम सातवाहन राज घराण्याने राज्ये केले. सातवाहन घराण्याच्या कारकिर्दीपासूनच मराठवाड्याच्या राजकीय इतिहासाचा प्रारंभ होतो. या घराण्याने एकूण ४६० वर्षे राज्य केले. या कालखंडात मराठवाड्याचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक कला आणि स्थापत्य कलेत मोठ्या प्रमाणात विशेष उल्लेखनीय प्रगती झाली. या सर्व घटकावर प्रकाश टाकणे महत्वाचे ठरते. वाकाटकांची राजवट ही मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरली. त्यामुळे वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळे आणि अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास करणे अत्यंत

महत्वाचे ठरते. त्यामुळे संशोधनासाठी ‘वाकाटकांच्या मराठवाड्यातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास’ या विषयाची निवड केली.

**१.२ संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) मराठवाड्याचा भौगोलिक आढावा घेणे.

२) मराठवाड्याचा ऐतिहासिक आढावा घेणे.

३) वाकाटक घराण्याच्या राजकीय इतिहासावर थोडक्यात प्रकाश टाकणे.

४) वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळांचा व पुरातत्वीय अवशेषांचा शोध घेणे.

५) वाकाटक कालीन मराठवाड्यातील अवशेषांचा शोध घेणे तसेच त्याचा सांस्कृतिक अभ्यास करणे.

६) वाकाटककालीन मराठवाड्यातील पुरातत्वीय अवशेषांच्या आधारे तत्कालीन सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक स्थितीवर प्रकाश टाकणे.

७) वाकाटककालीन मराठवाड्यातील कला व स्थापत्याचा अभ्यास करणे.

८) वाकाटककालीन लेण्या, मुर्तीकला आणि चित्रकलेचा आढावा घेणे.

**१.३ संशोधनाची गृहितके :**

१) वाकाटक घराण्याने ३०० वर्षे मराठवाड्यावर राज्य केले.

२) वाकाटाकांचा कालखंड हा मराठवाड्यासाठी सुवर्ण काळ ठरला. कंधार, नांदेड, तेर, भोकरदन, पैठण, लातूर, अजिंठा, उस्मानाबाद व वेरुळ ही वाकाटककालीन स्थळे अर्थात नगरे आहेत.

३) वाकाटक राजे धर्मसहिष्णु असल्यामुळे त्यांनी हिंदू धर्माप्रमाणेच बौध्द धर्मालाही राजाश्रय दिला.

४) अजिंठा आणि वेरुळ येथील कांही लेण्यांची निर्मिती वाकाटक काळात झाली.

५) अजिंठा लेण्यातील चित्रकला आणि शिल्पकला जगप्रसिध्द असून त्यामुळेच वाकाटक घराणे अजरामर ठरले.

६) वाकाटक सम्राटाने बौध्द लेण्या बरोबरच वैष्णव धर्माच्या लेण्याही खोदविल्या.

७) नांदेड जिल्ह्यातील शिऊर येथील वैष्णव लेण्या वाकाटककालीन कला व स्थापत्याचा उत्तम नमुना ठरतो.

**१.४ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:**

वाकाटकांच्या मराठवाडयातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास या विषयाचे संशोधन करत असताना मराठवाडयातील एकूण ८ जिल्हयाच्या क्षेत्रावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. मराठवाडा या विभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ २५ हजार चौ. मैल आहे. महाराष्ट्राच्या चार विभागापैकी मराठवाडा हा प्रादेशिक विभाग असून तो महाराष्ट्र राज्याचा एक महसूल विभाग आहे. मराठवाडयाला फार मोठया प्रमाणात इतिहास आणि संस्कृतीचा वारसा मिळालेला आहे. मराठवाडयाची राजधानी औरंगाबाद असून मराठवाडयामध्ये ८ जिल्हे व ७८ तालुके आहेत. वाकाटक घराण्याने इ.स. २५० ते ५५० या कालखंडामध्ये संपूर्ण मराठवाडयावर राजकीय वर्चस्व प्रस्थापित केले होते. या कालखंडामध्ये मराठवाडयाची सामाजिक, धार्मिक, आर्थिक, कला व स्थापत्य क्षेत्रामध्ये फार मोठया प्रमाणात प्रगती झाली आहे. संदर्भानुसार वाकाटक पुर्वीचा इतिहास सांगणे आवश्यक ठरते.

**१.५ संशोधनाची आवश्यकता :**

वाकाटक घराण्याने विदर्भातून संपूर्ण मराठवाड्यावर राज्य केले. वाकाटकांची राजधानी विदर्भात नागपूर जिल्ह्यातील रामटेक जवळील नंदिवर्धन होती. पुढे वाकाटक राजघराण्याच्या दोन शाखांचा उदय झाला. नंदिवर्धन ही जेष्ठ शाखा होती. तर वत्सगुल्म ही कनिष्ठ शाखा होती. वाकाटकांची राजवट मराठवाड्यासाठी सुवर्णकाळ ठरली. कारण या कालखंडात मराठवाड्याचा सर्व क्षेत्रात अभूतपूर्व विकास झाला. साहित्य लेणी आणि मंदिर स्थापत्य, चित्रकला आणि मुर्तीकला या क्षेत्रात या काळात अभूतपूर्व विकास झाला. या काळात अजिंठा, वेरुळ, घटोत्कच, उस्मानाबाद या ठिकाणी या काळात चैत्यगृह आणि विहार खोदविण्यात आले. या काळातील अंजिठा, वेरुळ येथील बौध्द विहार आणि चित्रकला जगप्रसिध्द आहेत. हे सर्व वाकाटक कालीन सांस्कृतिक ठेवा आहे. यावर संशोधन होणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे प्रस्तुत विषयावर संशोधनाची आवश्यकता आहे.

**१.६ संशोधन पध्दती व संदर्भ साधने :**

वाकाटकांच्या मराठवाड्यातील स्थळे व अवशेषांचा सांस्कृतिक अभ्यास. या विषयाच्या संशोधनासाठी सर्वेक्षण आणि संदर्भ या दोन संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्रामुख्याने सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. वाकाटककालीन मराठवाड्यातील स्थळांना भेट देऊन तेथील पुरातत्वीय अवशेषांचा अभ्यास केला आहे. या अवशेषांत मुर्तिशिल्प, लेणी, चित्रकला आणि इतर अवशेषांचा समावेश होतो. याच अवशेषांच्या आधारे

प्रस्तुत संशोधन पूर्ण केले आहे. पुरातत्वीय अवशेषांशिवाय संशोधनासाठी अनेक प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा उपयोग केला आहे. संदर्भ ग्रंथाची सर्वसमावेश यादी शोधप्रबंधात शेवटी दिली आहे.

**१.७ मराठवाड्याची भौगोलिक स्थिती :**

मराठवाडा हा एक प्रादेशिक विभाग आहे.

२००१ च्या जनगणनेनुसार या विभागाची लोकसंख्या१,६६,४९,३०२ असून त्यामध्ये ८१,०८,९६७ पुरुष व ८५,४०,३३५ स्त्रिया आहेत.[१] या विभागात एकुण आठ जिल्हे असून त्यामध्ये ७८ तालुके आहेत. पुढील तक्त्यावरुन आधुनिक मराठवाड्यातील जिल्हे, त्याचे क्षेत्रफळ, त्यामधील गावे, लोकसंख्या व त्यामधील तालुक्यांची कल्पना येते.

| **जिल्ह्याचे नाव** | **क्षेत्रफळ** | **गावे** | **लोकसंख्या** | **तालुके** |
|---|---|---|---|---|
| १. औरंगाबाद | १०,१००चौ.कि.मी. | १,३४४ | ३१२०६२८ | १. औरंगाबाद |
| | | | | २. कन्नड |
| | | | | ३. खुल्ताबाद |
| | | | | ४. गंगापूर |
| | | | | ५. वैजापूर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | ६. पैठण | |
| | | | ७. सोयगाव | |
| | | | ८. फलंब्री | |
| | | | ९. सिल्लोड | |
| २. जालना | ११,०३१ चौ.कि.मी. | १६१२३५७ | १. जालना | |
| | | | २. भोकरदन | |
| | | | ३. जाफराबाद | |
| | | | ४. मंठा | |
| | | | ५. अंबड | |
| | | | ६. परतूर | |
| | | | ७. बदनापूर | |
| | | | ८. घनसावंगी | |
| ३. परभणी | ११,०३१ चौ.कि.मी. | १४९११०९ | १. परभणी | |
| | | | २. सोनपेठ | |
| | | | ३. मानवत | |
| | | | ४. जिंतूर | |
| | | | ५. गंगाखेड | |
| | | | ६. पाथरी | |
| | | | ७. सेलू | |
| | | | ८. पूर्णा | |
| | | | ९. पालम | ४. |
| हिंगोली | ४,६३३ चौ.कि.मी. | ९८६७१७ | १. हिंगोली | |
| | | | २. कळमनुरी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ३. वसमत |
| | | | | ४. औंढा नागनाथ |
| | | | | ५. सेनगाव |
| ३. नांदेड | १०,५२८ चौ.कि.मी. | १,५८० | २८६८१५७ | १. नांदेड |
| | | | | २. लोहा |
| | | | | ३. कंधार |
| | | | | ४. मुखेड |
| | | | | ५. बिलोली |
| | | | | ६. धर्माबाद |
| | | | | ७.नायगाव बाजार |
| | | | | ८. उमरी |
| | | | | ९. किनवट |
| | | | | १०. अर्धापूर |
| | | | | ११. मुदखेड |
| | | | | १२. हिमायतनगर |
| | | | | १३. माहूर |
| | | | | १४. हदगाव |
| | | | | १५. भोकर |
| | | | | १६. देगलूर |
| ४.उस्मानाबाद | ७,५१२.४ चौ.कि.मी. | | १४७२२५६ | १. उस्मानाबाद |
| | | | | २. भूम |
| | | | | ३. कळंब |
| | | | | ४. वाशी |
| | | | | ५.उमरगा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६. तुळजापूर |
| | | | ७. परंडा |
| | | | ८. लोहारा |
| ५. लातूर | ७३,७२ चौ.कि.मी. | २०७८२३७ | १. लातूर |
| | | | २. औसा |
| | | | ३. निलंगा |
| | | | ४. उदगीर |
| | | | ५. चाकूर |
| | | | ६. अहमदपूर |
| | | | ७. जळकोट |
| | | | ८ शिरुर अनंतपाळ |
| | | | ९. रेणापूर |
| | | | १०. देवणी |
| | | | ११.शिरुर ताजबंद |
| | १०,६१५ चौ.कि.मी. | ५१५९८४१ | १. बीड |
| | | | २. पाटोदा |
| | | | ३. आष्टी |
| | | | ४. गेवराई |
| | | | ५. माजलगाव |
| | | | ६. केज |
| | | | ७. नेकनूर |
| | | | ८. अंबाजोगाई |
| | | | ९. किल्ले धारुर |
| | | | १०. परळी |

११.शिरुर(कासार)

**मराठवाड्याचे क्षेत्रफळ आणि चतु:सीमा :**

मराठवाडा हा प्रदेश उत्तरेस उत्तर अक्षांस १५°-४०' ते २०°-४०' आणि रेखांस ७०°-४०' ते ८१°-१५' विस्तारलेला आहे.[२] या विभागाचे भौगोलिक क्षेत्रफळ २५००० चौरस मैल आहे.[३] तसेच मराठवाड्याच्या चतु:सीमा पुढीलप्रमाणे आहेत.[४]

१. पूर्वेस - आंध्रप्रदेश

२. पश्चिमेस - नाशिक व अहमदनगर जिल्हा

३. दक्षिणेस - सोलापूर जिल्हा व कर्नाटक जिल्हा

४. उत्तरेस - जळगाव, बुलढाणा व वाशिम जिल्हा

थोडक्यात मराठवाड्याच्या सीमा महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, सोलापूर, जळगाव, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्याशी, कर्नाटकातील गुलबर्गा व बीदर जिल्ह्याशी आणि आंध्रप्रदेशातील निजामाबाद या जिल्ह्याशी जोडलेल्या आहेत.

**जमीन :**

मराठवाड्याची जमीन काळी, मुरमाड आणि खडकाळ स्वरुपाची आहे. मराठवाड्याचा भूभाग भूस्तरशास्त्राच्या दृष्टीने तृतीय युगापासून बनलेला एकजिनशी कृष्णप्रस्तर आहे. त्याची जाडी क्वचीत चार हजार फूट भरते. मराठवाड्याचा काही भाग गोदावरी आणि इतर नद्या यांच्या वालुकामय थरांनी बनलेला आहे. या भागाला उत्क्रांत तृतीय युगीन असे नाव आहे. यातील बराच प्रदेश कारी ( बॅसॉल्ट ) काथरी (डॉलराईट) या कृष्ण पाषाणाचा बनलेला आहे. मराठवाड्याचे दक्षिण ( दख्खन ) पठार समुद्रसपाटीपासून सरासरी बाराशे पन्नास फूट उंच आहे. क्वचित ही उंची साडे तीन हजार फूट पर्यंत जाते. पश्चिमेकडून पूर्वेकडे असा या पठाराचा उतार आहे.[५]

मराठवाड्याचा भूभाग भूकंपप्रवण भाग आहे. आजपर्यंत मराठवाड्यातील भूभागाला अनेक वेळा भूकंपाचे धक्के बसलेले आहेत. ३० सप्टेंबर १९९३ रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी पहाटे तीन वाजून बेचाळीस मिनिटांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील उमरगा तालुक्यातील सर्व गावांना आणि लातूर जिल्हा, औसा तालुक्यातील किल्लारी या गावास भूकंपाचा पहिला तीव्र धक्का बसला.[६] नंतर

तीन वाजून छपन्न मिनिटांनी पुन्हा दुसरा धक्का बसला. या भूकंपाच्या धक्क्याची तीव्रता ६.४ रिश्टर स्केल होती. याचवेळी संपूर्ण मराठवाडा आणि महाराष्ट्रातील बऱ्याच मोठ्या भूभागाला भूकंपाचा धक्का बसलेला होता. फरक एवढाच आहे की, किल्लारी व उमरगा परिसरातील भूकंपाच्या धक्क्याची तीव्रता सर्वाधिक होती. या भूकंपामुळे जगाला प्रचंड हादरा बसला. त्यामुळे मराठवाडा हा भाग जगाला परिचित झाला. लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील ६७ गावांना भूकंपाचा धक्का बसला होता. या भूकंपामुळे प्रचंड जिवित व वित्तहानी झाली. संपूर्ण गावे उध्द्वस्त झाली. शासकीय आकडेवारीनुसार लातूर जिल्ह्यातील ३७२६ आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील ३८५६ असे एकूण ७५८२ लोक भूकंपात ठार झाले. परंतु हा आकडा चुकीचा आहे. भुकंपामुळे ठार झालेल्या लोकांची संख्या पन्नास हजारांच्या वर आहे असे काही सेवाभावी संस्थांचा अहवाल आहे. भूकंपामुळे लातूर जिल्ह्यातील ८५,००० आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील ६०,००० घरांना तडे गेले असून आजही या भूभागाला भूकंपाचे सतत धक्के बसत आहेत.

**पर्वत आणि डोंगर :**

मराठवाड्यात पर्वताच्या रांगा आणि मोठमोठे डोंगर आहेत. मराठवाड्याचे दक्षिण पठार समुद्रसपाटीपासून सरासरी १२५० फूट उंच आहे. क्वचित त्याची उंची ३५०० फूट जाते. या पठाराचा उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे. पर्वताच्या रांगा प्रामुख्याने सह्याद्रीशी संबंधित आहेत. पूर्व भागातील बालाघाटच्या डोंगराची रांग सुमारे २०० मैल लांब साडे चार मैल रुंद आहे.[७] बीड, लातूर, परभणी व नांदेड या जिल्ह्यात बालाघाटचा डोंगराळ प्रदेश आहे. औरंगाबाद जिल्ह्यात सुरतपालनाथ टेकड्या आहेत. वेरुळ, चौका व सातारा हे डोंगर आहेत. औरंगाबाद शहराजवळ एक मोठी टेकडी आहे. त्या टेकडीस संभाजी टेकडी या नावाने आज ओळखले जाते. याच जिल्ह्यात सातमाळ आणि अजिंठाच्या डोंगर रांगा आहेत. जालना जिल्ह्यात जांबुवंत टेकडी आणि अजिंठ्याचे डोंगर आहेत.

उस्मानाबाद जिल्ह्याचा बराच भूभाग हा बालाघाट पठाराचा आहे. यामध्ये उस्मानाबाद भूम, कळंब व तुळजापूर तालुक्याचा काही भाग व उमरगा तालुक्याचा समावेश होतो. या जिल्ह्यात राणा टेकडी व देवबेट या टेकड्या आहेत. उस्मानाबादच्या पश्चिमेला हातलादेवीचा डोंगर म्हणून

ओळखली जाणारी एक मोठी टेकडी आहे. जिल्ह्याच्या दक्षिण सीमेवर बालाघाटचे डोंगर आहेत. नांदेड जिल्ह्यात मुदखेड टेकड्या, सातमाळ, निर्मल व बालाघाट या डोंगररांगा आहेत. डोंगराळ भागात भीमटेक व शिवलिंगप्पा ही शिखरे आहेत. नांदेड जिल्ह्याच्या उत्तरेला सातमाळ व निर्मलचे डोंगर आहेत. यामध्ये भोकर, हदगांव व किनवट तालुक्यांचा भूभाग येतो. कंधार व मुखेड हे तालुके आणि देगलूर तालुक्याचा दक्षिणेकडील भाग हे बालाघाट डोंगराच्या प्रदेशात येतात. लातूर जिल्ह्यात बालाघाटचे काही डोंगर आहेत. या डोंगराळ भागात लातूर, औसा, निलंगा हे तालुके व चाकूर तालुक्याचा दक्षिण भाग व उदगीर तालुक्याचा दक्षिण व पश्चिम भाग येतो.

मराठवाड्यातील पर्वताच्या रांगा मुख्यत: सह्याद्रीशी संबंधित आहेत. पूर्व भागातील बालाघाट डोंगराची रांग सुमारे दोनशे मैल लांब आणि साडेचार मैल रुंद आहे. मराठवाड्यात पसरलेल्या सह्याद्री पर्वताच्या रांगानी या भागाच्या सांस्कृतिक इतिहासात महत्वाची भर घातली आहे. अजिंठा आणि वेरुळ - येथील जगप्रसिध्द लेणी हे त्याचे बोलके उदाहरण आहे.[८] येथील पर्वतरांगेतील दगडावर कला निर्माण करण्यात मूर्तिकार आणि स्थापत्य कलाकार यशस्वी झालेला आहे. औरंगाबाद जिल्ह्याच्या पश्चिम टोकापासून नांदेड जिल्ह्यातील माहूरपर्यंत पसरलेली इन्ध्याद्री किंवा अजिंठ्याच्या डोंगराची जी रांग आहे तिचा प्राचीन साहित्य व अभिलेखीय साधनात सह्याद्री पर्वत या नावाने उल्लेख केला आहे.[९] पितळखोरा ( पितंगल्य ) व अजिंठा ( मंदारगिरी ) लेण्यांचा डोंगर या त्याच्या शाखा आहेत. अजिंठा लेण्याच्या डोंगराचे प्राचीन नाव मंदरगिरी (मंदारगिरी) असून हा पर्वत पवित्र असल्याचे म्हटले आहे. [१०] अजिंठ्याची पर्वतरांग ही पश्चिम घाटातील पर्वतरांगेत महत्वाची आहे. या पर्वतरांगेने खानदेश व विदर्भाला मराठवाड्यापासून व तापी व गोदावरी यांची खोरी विभक्त केली आहेत. या परिसरातील सह्याद्री पर्वताची दुसरी महत्वाची रांग म्हणजे देवगिरी किल्ला ते जालना ही आहे. जालन्याचे डोंगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पर्वतमालेतील वेरुळजवळील रांगेस चरणाद्री आणि इंध्याद्री या नावाने ओळखले जाते.[११] या डोंगरात वेरुळची जग प्रसिध्द लेणी कोरली गेली. बीड व उस्मानाबाद भागात असणारी बालाघाट पर्वताची रांग ही मराठवाड्यातील तिसरी सह्याद्री पर्वताची रांग आहे. या रांगेने मराठवाडा पश्चिम

महाराष्ट्रापासून विभक्त केला. याशिवाय या महत्वाच्या पर्वतरांगाना जोडणाऱ्या अनेक लहान - मोठ्या रांगा या परिसरात पसरलेल्या आहेत.

**नद्या :**

गोदावरी, मांजरा व पूर्णा या मराठवाड्यातील मुख्य नद्या आहेत. त्र्यंबकेश्वराजवळ उगम पावलेली गोदावरी नदी पुणतांबे या गावाजवळ मराठवाड्यात प्रवेश करते. दक्षिण गंगा म्हणून लोक तिची प्रदक्षिणा करतात. पूर्णा व मांजरा या दोन नद्या गोदावरी नदीला मिळतात. गोदावरी नदीच्या काठावर नांदेड व पैठण ही दोन ऐतिहासिक शहरे वसलेली आहेत. उस्मानाबाद तालुक्यातील तेरणा व भोगावती या दोन नद्या महत्त्वाच्या आहेत. तेरणा नदीच्या काठावर तेर हे ऐतिहासिक खेडे वसलेले आहे व भोगावती नदीच्या काठावर उस्मानाबाद हे शहर वसलेले आहे. उस्मानाबाद शहराच्या अगदी मध्यभागातून भोगावती नदी वाहते. मराठवाड्यातील सर्व नद्या पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहतात.[१२] गोदावरी, मांजरा व पूर्णा या मराठवाड्यातील प्रमुख नद्या आहेत. गोदावरी ही या भागातील प्रमुख नदी आहे. नाशिकजवळ त्र्यंबकेश्वर येथे उगम पावलेली ही नदी पुणतांबे गावाजवळ मराठवाड्यात प्रवेश करते आणि पुढे ती उस्मानाबाद शिवाय मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातून वाहते. नांदेडजवळ या नदीची नाभी मानून सिंहस्थान दक्षिणेतील लोक तिची प्रदक्षिणा करतात.[१३] दक्षिण भारतातील द्विपकल्पात ही सर्वात मोठी आणि भारतातील पवित्र नदी म्हणून तिला गौतमी गंगा किंवा गंगा[१४] आणि दक्षिण गंगा[१५] नावाने ओळखले जाते. गौतम ऋषीच्या प्रयत्नाने गोदावरी भूतलावर अवतरली म्हणून तिला गौतमी गंगा या नावाने ओळखले जाते.[१६] गोदावरी नदीचा प्रवास ९०० मैलांचा असून ती १,१२,००० चौरस मैलांचा प्रदेश आपल्या पाण्याने भिजविते.[१७] पूर्णा व मांजरा या गोदावरीच्या प्रमुख उपनद्या आहेत. याशिवाय प्राणहिता, वर्धा, वैनगंगा, इंद्राती[१८], दुधना, गिरजा, तेरणा, सिंधफर्णा, कनाद, प्रवरा, मुळा, शबरी व धारणा या नद्या गोदावरीला येऊन मिळतात. पूर्णा नदीचा उगम अजिंठा डोंगरात झाला असून तिची लांबी २१५ कि.मी. आहे. सिंधफणा नदीचा उगम ता. आष्टी जि. बीड येथे झाला असून तिची लांबी २५० कि.मी. आहे. गोदावरीच्या जलौघामुळे मराठवाड्याचे दोन भागात विभाजन झाले. उत्तरेकडील

भागात औरंगाबाद, जालना, परभणी व नांदेडचा काही भाग येतो, तसेच दक्षिणेकडील भागात बीड, जालना, लातूर, उस्मानाबाद व नांदेडच्या दक्षिण भागाचा समावेश होतो.

मांजरा ही मराठवाड्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी नदी आहे. या नदीचे उगमस्थान ता. पाटोदा जि. बीड येथे असून तिची लांबी ३०० कि.मी. आहे. याच नदीला मंदाकिनी व मंजीसुदा या नावानेही ओळखले जाते.[१९] नांदेड जिल्ह्यातील जुन्नी येथे कलचुरी राजवटीच्या प्राप्त झालेल्या इ.स. ११८४ मधील एका शिलालेखात या नदीचा उल्लेख मंजरतीर्थ[२०] व गोदावरीचा उल्लेख गौतमी या नावाने केला आहे. याशिवाय वंजरा, मंजुळा, व वंजुळा[२१] या नावांनीही या नदीचा उल्लेख प्राचीन साहित्यात केला आहे. बीडच्या पश्चिमेस बालाघाटात उगम पावलेली मांजरा नदी बीड, उस्मानाबाद कर्नाटक व आंध्र प्रदेश असा प्रवास करुन शेवटी ती आंध्र - महाराष्ट्रात सीमेवर गोदावरीला मिळते. या नदीचे उगमस्थान असलेल्या बालाघाट डोंगराचे प्राचीन नाव मंजर किंवा वंजर असे होते. त्यावरुन मांजरा नावाची नदी उत्पन्न झाली.

तेरणा ही मराठवाड्यातील तिसरी महत्त्वाची नदी आहे. या नदीचे प्राचीन नाव नगर[२२] असून याच नदीच्या दक्षिण काठावर तेर हे गाव ( ता. उस्मानाबाद ) वसले आहे.[२३] बिंदुसरा किंवा बेंडसुरा ही या भागातील चौथी नदी असून तिचे प्राचीन नाव कलिंदकन्या असे आहे. बीडच्या दक्षिणेस बालाघाटाच्या डोंगरात या नदीचा उगम झाला आहे. बालाघाटच्या या शाखेचे नाव कलिंद असल्याने या नदीचे नाव कलिंद कन्या असे पडले.[२४] या नदीच्या काटावर बीड हे शहर वसलेले आहे. ही नदी बीडच्या उत्तरेस काही अंतरावर गोदावरीची उपनदी असलेल्या सिंहफणा (सिंधफणा ) नदीस मिळते. पेनगंगा ही गोदावरीची उपनदी मराठवाड्याच्या उत्तर सरहद्दीवरुन वाहते. या नदीचे प्राचीन नाव प्राणहिता ( प्रणिता ) आहे. सीना ही अहमदनगर जवळील बालाघाट डोंगरात उगम पावते व ती उस्मानाबाद जिल्ह्याच्या पश्चिमेस सरहद्दीवर वाहते. या नदीचे प्राचीन नाव सिंहा असे होते.[२५]

मन्याड ( मनार ) ही या भागातील महत्त्वाची नदी आहे. औरंगाबाद व नाशिक जिल्ह्याच्या सरहद्दीवरुन वाहणाऱ्या या नदीचे नाव प्राचीन राष्ट्रकुटांच्या ताम्रपटात मणिआडा असे आढळते.[२६] याच नावाची एक नदी नांदेड जिल्ह्यात आहे. या नदीच्या उत्तर काठावर राष्ट्रकूटांची

राजधानी असलेले कंधार वसलेले आहे. या नदीचे उगमस्थान बीड जिल्ह्यातील धर्मापुरीजवळ आहे. अशाप्रकारे गोदावरी व तिच्या उपनद्यांनी मराठवाड्याचा परीसर सुपीक व समृध्द बनविला आहे.

**हवामान :**

मराठवाड्यातील सरासरी हवामान किंचित उष्ण आणि कोरडे आहे.[२७] नांदेड जिल्ह्यातील हवामान उन्हाळ्यात उष्ण व हिवाळ्यात जास्त थंड असते. मराठवाड्यात नांदेड जिल्ह्यात उन्हाळ्यात सर्वाधिक उष्णता असते. परभणी जिल्ह्यात पावसाळ्यातील हवामान उष्ण आणि दमट असते. लातूर जिल्ह्याचा भाग डोंगराळ आणि पठारी असल्यामुळे उन्हाळ्यात तेथील हवामान सौम्य व कोरडे असते. पावसाळ्यात तेथील हवामान दमट असते तर हिवाळ्यात थंड आणि कोरडे असते. मराठवाड्यात पाऊस फार कमी पडतो. काही भागात मात्र पाऊस अधिक पडतो. उस्मानाबाद जिल्ह्याच्या पूर्व भागात पाऊस जास्त पडतो तर पश्चिम भागात कमी पाऊस होतो. लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुका, परभणी जिल्ह्याचा पूर्व भाग ( वसमत व पूर्णा ) आणि उत्तरेकडील डोंगराळ भागात ( जिंतूर, चारठाणा, येलदरी व सेनगाव ) तसेच नांदेड जिल्ह्यातील किनवट, भोकर व हदगाव तालुक्यात पाऊस जास्त पडतो. नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुका, उस्मानाबाद जिल्ह्याचा भाग, लातूर जिल्ह्यातील उदगीर, रेणापूर, निलंगा, चाकूर, लातूर व औसा तालुका आणि परभणी जिल्ह्याच्या पश्चिम ( सेलू व पाथरी ) भागातही पाऊस जास्त पडतो.

**नैसर्गिक संपत्ती :**

मराठवाड्यात नैसर्गिक संपत्तीभरपूर आहे.[२८] मराठवाड्यात अनेक ठिकाणी वने आणि डोंगराळ भाग आहे. तुळजापूर ते येरमाळा डोंगरावर तुळजाई - येडाई वनीकरण योजनेखाली अनेक वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. कन्नड येथे गवताळ अभयारण्य व नांदेडजवळ पैनगंगा अभयारण्य आहे. किनवटच्या परिसरात नैसर्गिक जंगल आहे. जिंतूर, हिंगोली, वसमत, सेनगांव, कळमनुरी, भोकर, हदगाव, तुळजापूर, उस्मानाबाद, भूम, परांडा, कन्नड, औरंगाबाद, खुलताबाद, बीड, अंबाजोगाई, पाटोदा, गेवराई, माजलगाव, आष्टी, अहमदपूर आणि इतर अनेक ठिकाणी सुध्दा वने आणि डोंगर आहेत. या वनात बाभूळ, खैर, कडूलिंब, पळस, टेंभूर्णी, चिंच, आंबा,

जांभूळ, मोह, वड, पिंपळ, केकताड, ( घायपात ), बेल, आपटा, बोर, अरोनी, हिवर, कवठ, साग, बांबू, तेंदू, धावडा, ऐन, बेहडा, सिताफळ, सौदंड व उंबर इत्यादी वृक्ष आढळतात. नांदेड जिल्ह्यात सागाची झाडे जास्त आहेत.

मराठवाड्यातील वनात हरीण, अस्वल, काळवीट, वानर, माकड, कोल्हा, ससा, मुंगूस, तरस, रानडुक्कर, लांडगा, वाघ व बिबट्या हे प्राणी आणि मोर, पोपट व इतर पक्षी आहेत. किनवटजवळ असलेल्या पैनगंगा अभयारण्यात वाघ, बिबट्या, अस्वल व मोर आढळतात. गंगाखेड तालुक्यातील जांभूळबेट येथे मोर पाहावयास मिळतात. नांदेड जिल्ह्यात किनवट, माहूर, सिंदखेड व साखणी या भागात जंगले आहेत. त्यामध्ये अनेक प्रकारचे प्राणी आहेत. इ.स. १९९७ साली या भागातील प्राण्यांची गणना वनविभागातर्फे करण्यात आली. त्यानुसार या भागात एक वाघ, तीस अस्वल, तेरा बिबटे, ५३१ हरीण व ७८५ मोर आढळून आले आहेत. इ.स.१९०० साली भारतात चाळीस हजार वाघ होते. पण शिकारीमुळे त्यांची संख्या १९७३ साली १८२७ झाली. १९८९ साली ही संख्या ४३३४ झाली. पण १९९३ साली पुन्हा वाघांची संख्या घटली व ती ३७५० झाली. कंधार, मुखेड व देगलूर तालुक्यात गवताची मोठी कुरणे आहेत. हिंगोली, जिंतूर व सेनगाव तालुक्यात रोशा नावाचे गवत वाढते.

मराठवाड्यातील वनात अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आढळतात. अहमदपूर तालुक्यातील वडवळ या गावाजवळ एक लहान डोंगर आहे. यास वडवळ बेट असे म्हटले जाते. या डोंगरावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत. अंबाजोगाई शहराच्या उत्तरेस दोन कि.मी. अंतरावर मुकुंदराज स्वामीच्या मंदिराजवळून बुट्टेनाथाची दरी सुरु होते. औषधी वनस्पतीचा खजिना असलेली ही दरी व वाणा नदीचे खोरे बुट्टेनाथची दरी या नावाने ओळखली जाते.

**१.८ मराठवाड्याचा ऐतिहासिक आढावा :**

मराठवाड्याला इतिहास व संस्कृतीचा फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. या विभागाने महाराष्ट्र व देशाच्या सांस्कृतिक जडण-घडणीत, कला - स्थापत्य व मूर्तिकलेच्या क्षेत्रात फार मोलाची भर घातली. अजिंठा, वेरुळ, खरोसा, पितळखोरा, औरंगाबाद व उस्मानाबाद येथील लेणी व तेथील कला - स्थापत्य हे याचे बोलके उदाहरण आहे. आज मराठवाडा हा महाराष्ट्र

राज्याचा स्वतंत्र प्रशासकीय विभाग आहे. महाराष्ट्राच्या मध्यभागी असलेले औरंगाबाद हे शहर मराठवाड्याच्या राजधानीचे ठिकाण तसेच प्रशासनाचे विभागीय मुख्यालय आहे. आज मराठवाडा विभागात नांदेड, परभणी, जालना, औरंगाबाद, हिंगोली, बीड, लातूर व उस्मानाबाद हे आठ जिल्हे आहेत.

प्राचीन महाराष्ट्राचे केंद्रस्थान असलेल्या मराठवाडा या प्रदेशाला प्राप्त झालेली मराठवाडा ही भौगोलिक संज्ञा म्हणजे ऐतिहासिक अपघाताची निष्पत्ती होय, या शब्दाचे मराठ हे पूर्वपद महाराष्ट्र या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रुप असून त्याचे उपपद वाडा हे वाटक या संस्कृत शब्दाचे तद्‌भव होय. वाडा किंवा वाडी ही उपपदे प्राचीन काळात दक्षिणेत प्रांतिक प्रशासन विभागांना लावलेली आढळतात. उदा. गंगवाडी ९६०००, नोलम्बवाडी ३२००० व मराठवाडी ७००० इत्यादी. अशाच अर्थाने मराठवाडी व मरहटवाडी या प्रादेशिक संज्ञेचा उल्लेख टिपू सुलतानच्या ( १७५३ ते १९७७ ) पत्रात सर्वप्रथम आढळतो.[२९] अठराव्या शतकात उत्तरार्धातील हा उल्लेख हैदराबाद संस्थानातील मराठी भाषिक प्रदेशाच्या म्हणजेच मराठवाड्याच्या संदर्भातील होय.

हैदराबाद संस्थानाच्या कागदोपत्रीही पुढे या प्रदेशाचा उल्लेख मराठवाडी असाच केल्याचे आढळते. याचेच पुढे मराठवाडा असे रुपांतर झाले. ते आजही कायम आहे. मीर महबुब अलीखान बहादुर ( इ.स. १८६९-१९११ ) या निजामाच्या कारकीर्दीतील सरकारी कागदपत्रात मराठवाडी या प्रादेशिक संज्ञेचा उल्लेख आढळतो. याच निजामाचा मुख्यमंत्री सर सालारजंग पहिला याने इ.स. १८७० मध्ये आपल्या राज्याची नवीन जिल्हाबंदी करुन मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या प्रदेशाचा औरंगाबाद सुभा निर्माण केला आणि त्यास मराठवाडी - मराठवाडा असे नाव दिले.[३०]

मराठवाडा हा शुध्द मराठी शब्द असून त्याचा अर्थ मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांची मातृभूमी, जन्मभुमी असा होतो. हैदराबादचे निजाम राज्य स्थापन होण्यापूर्वी हा प्रदेश मोगल साम्राज्यातील औरंगाबाद सुभ्याचा एक भाग होता. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात मात्र मराठवाडा हे प्रादेशिक नाव अस्तित्वात नव्हते. प्राचीन काळात हा प्रदेश दक्षिणापथाचा तर

मध्ययुगीन काळात दख्खनचा ( Deccan ) एक भाग होता. या प्रदेशाची सीमा वेळोवेळी बदलत गेल्या.

**दक्षिणापथ आणि मराठवाडा :**

विंध्यपर्वत व त्याच्या दक्षिणेकडील समांतर वाहणाऱ्या नर्मदा नदीमुळे भारतवर्षाचे दोन मोठ्या भागात विभाजन झाले. यापैकी उत्तरेकडील भागास उत्तरापथ आणि दक्षिणेकडील भागास दक्षिणापथ असे म्हटले जाते. प्राचीन साहित्यात डेक्कन पठार ( दख्खन पठार ) या भूमीस दक्षिणदेशा या नावाने उल्लेखिले आहे. दक्षिणदेशा हा संस्कृत शब्द आहे. डेक्कन हा शब्द दक्षिणा या संस्कृत शब्दांचा अपभ्रंश आहे. संस्कृत साहित्य व शिलालेखातून त्याचा उल्लेख दक्षिणापथ असा येतो, तर त्यालाच दक्षिणात्य, दाक्षिणाशा असे संबोधिले आहे. इ.सनाच्या पहिल्या शतकात भारताला भेट दिलेल्या एका अज्ञात महान खलाशाने डेक्कन भूमीचा ( दक्षिणापथ ) उल्लेख दक्षिणाबेडस या नावाने केला आहे.[३१] त्याच्या सीमा भडोचपासून दामीटिका ( द्रविडदेश ) पर्यत असल्याचेही त्याने म्हटले आहे. इ.सनाच्या पाचव्या शतकात फाहीएन या चीनी प्रवाशाने भारताला भेट दिली. त्याने भारताचा उल्लेख ता.थीझम (Ta-Thism) या नावाने केला आहे.[३२] ता-थीझम हा दक्षिण या नावाचा अपभ्रंश असावा. तसेच दक्षिण हे नाव पाचव्या शतकाच्या प्रारंभापासून प्रचलीत असले पाहिजे. गुलाम यांच्या खंडप्राय भारताच्या सह्याद्रीपासून महेंद्रगिरीपर्यंत आणि उत्तरेस महानदी-गोदावरीपासून ते कृष्णा -तुंगभद्रे पर्यंत व बंगालच्या उपसागरापासून ते अरबी समुद्रापर्यंतच्या प्रदेश म्हणजे डेक्कन ( दख्खन ) होय.[३३] थोडक्यात डेक्कन भूमीस दाक्षिणात्य दक्षिणदेशा, दक्षिणापथ, दंडकारण्य, संस्कृत ग्रंथ व शिलालेखात दक्षिणाबेडस, इत्यादी नावानी उल्लेखिले आहे. प्राचीन काळात मराठवाडा हा दक्षिणापथाचा एक भाग होता.

सह्याद्रीच्या असंख्य लहानमोठ्या रांगा हे दक्षिणापथाचे खास वैशिष्ट्ये असून या रांगानी अनेक ठिकाणी घाट निर्माण केलेले आहेत. यापैकी काही घाट अनादी अनंत काळापासून प्रसिध्द असून याच घाटांनी पूर्व - पश्चिमेचा दुवा सांधलेला आहे. सह्याद्रीच्या पश्चिमेकडील प्रमुख रांगेतून पूर्वेकडील भूप्रदेशात व पर्वताच्या अनेक लहान लहान रांगा विखुरलेल्या आहेत. या पर्वतरांगामधूनच दक्षिणापथाच्या अनेक नद्यांचा उगम झालेला आहे. एवढेच नाही तर पर्वतरांगामुळेच गोदा आणि

तापी या दोन नद्यांची खोरी विभागली गेली.[३४] या अनुषंगानेच दक्षिणापथामध्ये अश्मक[३५], मुलक[३६], भोगवर्धन[३७], कुंतल[३८], कलिंग, आंध्र[३९] व महाराष्ट्र[४०] इत्यादी जनपदांचा विकास झाला आहे.

**जनपदे आणि राज्ये :**

**अश्मक**

मराठवाड्यात प्राचीन काळात बरीच जनपदे आणि राज्ये होती. अश्मक, मूलक, भोगवर्धन, कुंतल महाराष्ट्र व पितनीक ही जनपदे व राज्ये आहेत. इ.पू. सहाव्या शतकात भारतात सोळा राज्ये अस्तित्वात होती. बौध्द वाङ्मयात त्यांचा उल्लेख षोडसमहाजनपद या नावाने केला आहे. यापैकी बहुतेक जनपदे उत्तर भारतात होती. अश्मक आणि मूलक राज्येच केवळ दक्षिणेत होती. ही दोन्ही जनपदे मराठवाड्यात होती. अश्मक हे जनपद दक्षिण भारतातील सर्वात प्राचीन जनपद असून ते गोदावरी नदीच्या खोऱ्यात होते. अश्मक जनपदाची राजधानी पोटन होती. हे पोटन म्हणजेच आजचे निजामाबाद जिल्ह्यातील बोधन हे नगर होय.[४१] कंधार आणि बोधन यांच्यातील अंतर कमी आहे. या शिवाय कंधारचा भाग गोदावरीच्या खोऱ्यातच मोडतो. यावरुन कंधारचा भाग हा पूर्वी अश्मक जनपदात मोडत होता हे सिध्द होते. डॉ. हरिहर ठोसर यांच्या मते अश्मक जनपदाने नांदेड जिल्ह्याचा प्रदेश व्यापला असून इ.पू. ६०० हा त्याचा काळ आहे.[४२]

दक्षिणेतील एक प्रमुख राज्य म्हणून या जनपदाचा उल्लेख बौध्द वाङ्मय (सुत्तनिपात व अंगुत्तरनिकाय ) पाणिनीची अष्टाध्यायी, महाभारत, पुराणे व काव्यमिंमांसा इत्यादी ग्रंथात आढळतो. प्लीनी याने लिहिले की, डेक्कन म्हणजेच दक्षिणापथामध्ये प्रतिष्ठाण ( आधुनिक पैठण ) या नगराच्या दक्षिणेस गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर अस्मगी नावाचे आदिवासी लोक राहत होते. या आदिवासी लोकांचा उल्लेख अस्सक व अस्मक या नावानेही केला आहे.[४३]

गोदावरी व मांजरा नद्यांच्या परिसरात आणि निजामाबाद जिल्ह्यातील संलग्न प्रदेशात वसलेल्या अश्मक राज्याचा विस्तार कालांतराने नर्मदा नदीपर्यंत झाला. इ.पू. चौथ्या शतकात ते मगधाच्या नंदानी जिंकून घेतले. त्यामुळे आता अश्मक राज्य मगध साम्राज्याचा एक भाग बनला. अश्मक राज्यात सर्वत्र मोठमोठे शिलाखंड विखुरलेल्या स्थितीत आढळतात. त्यामुळे या राज्याला

अश्मक नाव प्राप्त झाले असावे. या परिसरात असना नावाचीही नदी आहे. असना या संस्कृतमध्ये अश्मनाम्ना म्हणतात. म्हणून आसना या नदीचाही संबंध अश्मक या नावाशी असावा.

**भोगवर्धन :**

जालना जिल्ह्यात भोकरदन नावाचे प्राचीन नगर आहे. हे भोकरदन पूर्वी भोगवर्धन या नावाने ओळखले जात असे.[४४] दक्षिणेतील एका जनपदाची ही राजधानी होती. शिवाय व्यापारी आणि औद्योगिक केन्द्र असल्याने ते एक वैभवशाली नगर म्हणून ओळखले जात असे. अजिंठ्याचे डोंगर व जालन्याचे डोंगर यामधील पठार म्हणजे औरंगाबाद, जालना आणि बुलढणा या जिल्ह्यातील संलग्न प्रदेश या जनपदात समाविष्ट होता. इ.स.च्या सातव्या शतकात हे एका विषय विभागाचे मुख्यालय होते. अश्मक राज्यात विलीन झाल्यामुळे नंतरच्या काळात त्याचे फारसे उल्लेख आढळत नाहीत. वेरुळ आणि अजिंठा या बौध्द केंद्राचा भोगवर्धन या नगराशी संबंध होता. विनय ग्रंथात उल्लेख आढळतो की, भोगवर्धन जनपद ही दक्षिणापथ भूमी असून ते गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वसलेले होते. या जनपदात अजिंठ्याचे डोंगर आणि जालन्याचे डोंगर यामधील पठार म्हणजे औरंगाबाद, जालना व बुलढाणा या जिल्ह्यातील संलग्न प्रदेश समाविष्ट होता.[४५] या जनपदाचा संभाव्य काळ इ.स. पू. ४०० असून नंतरच्या काळात हे जनपद अश्मक जनपदात विलीन झाले. भोगवर्धन व मूलक जनपदाचा उल्लेख पुराणात आढळतो. इ.सनाच्या सातव्या शतकात भोगवर्धन हे एका विषय विभागाचे मुख्यालय होते.

**मूलक :**

मूलक या जनपदाचा उल्लेख कौटिल्याचे अर्थशास्त्र, पुराण आणि सुत्तनिपात व अंगुत्तरजिकाय या पाली साहित्यात आढळतो. या जनपदाचा उल्लेख काही ठिकाणी स्वतंत्रपणे तर काही ठिकाणी अश्मकाबरोबर केलेला आढळतो. यावरुन असे स्पष्ट होते की, प्रारंभी अश्मक व मूलक ही स्वतंत्र राज्ये होती. परंतु नंतरच्या काळात मात्र मूलक हे जनपद अश्मकात विलीन झाले. दौलताबाद ते जालना, पर्वतरांगेत मूलक हे जनपद वसलेले होते. या जनपदाचे औरंगाबाद व जालना जिल्ह्याचा दक्षिण भाग आणि नगर व नासिक जिल्ह्याचा सलग प्रदेश व्यापलेला होता. या

जनपदाचा काळ इ. पू. ५०० असून त्याची राजधानी प्राचीन प्रतिष्ठान म्हणजेच आजचे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण होय. पाली साहित्यात मूलकाची राजधानी प्रतिष्ठान असल्याचा उल्लेख आढळतो.[४६] टॉलेमी याने पैठणचा ( प्रतिष्ठान ) उल्लेख बैठण ( Baithan) असा केला असून तो म्हणतो की हे बैठण नगर पश्चिम घाटाच्या पूर्वेस गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वसलेले आहे.[४७]

अनेक जातककथा व पुराणावरुन स्पष्ट होते की गोदावरी नदीच्या काठावर अश्मक व मूलक ही दोन जनपदे वसलेली होती. ही दोन्ही जनपदे परस्परांना लागून असली तरी ती दोन स्वतंत्र टोळ्यांनी वसविलेली होती, असे पाली साहित्यावरुन स्पष्ट होते. गोदावरी नदी हा या दोन राज्यातील विभाजक अर्थात सरहद्द असावी. परमार्थ जातकावरुन स्पष्ट होते की अश्मकाच्या उत्तर - पश्चिमेस मुलक आणि दक्षिण - पूर्वेस कलिंग होते. अश्मक व मूलक या दोन टोळ्यांचा उल्लेख बौध्द साहित्यात आढळतो.

**पितनीक**

मौर्य सम्राट अशोकाच्या पाचव्या व आठव्या शिलासनात पितनीक किंवा पेत्तनिकांचा उल्लेख आढळतो. हा उल्लेख टोळीच्या राज्याचा किंवा टोळीचा असला पाहिजे. पाचव्या शिलासनात पेतनिक शब्द राष्ट्रीक शब्दाबरोबर तर तेराव्या शिलासनात अर्थात शासनात भोजिक बरोबर आलेला आहे.[४८] काशीप्रसाद जयस्वाल व डॉ. रा.श्री. मोरवंचीकर[४९] यांनी पेतनीक हे पैठणचे रहिवाशी होते, हे मान्य केले आहे. पेतनिक हा पैठण येथील राजकीय संघ होता. मगधातील नंदाच्या ऱ्हासानंतर संधी मिळताच या संघाने पैठण परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले व अल्पावधितच प्राचीन मूलक राज्याच्या परिसरात आपले राज्य स्थापन केले. हेच पेतनीक जनपद होय. या पेतनिक जनपदाची राजधानी प्रतिष्ठान म्हणजेच आधुनिक पैठण होती.[५०] या जनपदाच्या काळात पैठण येथील महामंडलेश्वराच्या नियंत्रणाखाली संपूर्ण दख्खन प्रदेश होता. इ.स.पू.४०० हा या जनपदाचा काळ आहे.

**कुंतल :**

सातवाहन काळापासून ते बाराव्या शतकापर्यंतच्या अनेक ताम्रशिलासनातही कुंतल देशाचे वर्णन केलेले आढळते.[५१] ग्रीक इतिहासकारांनी मात्र कुंतल देशाचा उल्लेख गोंडोलोई या नावाने केलेला

आहे.[५] सोढ्ढलाच्या उदयसुंदरी कथेत कुंतल देशाची राजधानी प्रतिष्ठान ( पैठण ) असल्याचे म्हटले आहे.[५३] कुंतल देशाच्या सीमा भीमा व वेदवती या नद्यांनी मर्यादीत झालेल्या होत्या. इ.सनाच्या सातव्या शतकानंतर मात्र कुंतल देशाच्या राज्याची व्याप्ती वाढत गेली. काव्यमिमांसेचा लेखक राजशेखरनकुंतल देशात विदर्भ समाविष्ट असल्याचे म्हटले आहे.[५४] कल्याणच्या चालुक्यांचा संपूर्ण राज्यात कुंतल अशी संज्ञा होती.[५५] चालुक्य आणि राष्ट्रकूट घराण्यातील राजांना कुंतलेश्वर या उपाधीने संबोधले जात होते.[५६] इ.सनाच्या अकराव्या शतकातील मराठवाड्यातील शिलालेखावरुन स्पष्ट होते की, मराठवाडा हा भूभाग कुंतल देशात समाविष्ट होता.[५७] पुढे सातारा, कोल्हापूर, सांगली व अहमदनगर जिल्ह्याचाही समावेश कुंतल देशात झाला. उस्मानाबाद जिल्ह्यात भूम तालुक्यात बालाघाट पर्वताच्या रांगा आहेत. त्यास कुंतलगिरी या नावाने ओळखले जाते.

## महाराष्ट्र

मौर्य सम्राट अशोकाच्या आलेखात सर्वप्रथम महाराष्ट्र हे देशनाम आढळते. [५८] महाराष्ट्र या राज्याची राजधानी पैठण असल्याचा उल्लेख आढळतो.[५९] यावरुन आधुनिक मराठवाडा प्रदेश हा मूळचा महाराष्ट्र होता असे स्पष्ट होते. उत्तर भारतातील मगधांच्या नंद सम्राटांनी दक्षिण भारत जिंकल्यानंतर येथील अश्मक, मूलक, विदर्भ व कुंतल हे या प्रदेशाचे एकत्रिकरण करुन त्यास महाराष्ट्र असे नाव दिले आहे. मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील इ.स. ३६५ मध्ये कोरलेल्या एरण गावच्या स्तंभलेखात श्रीधरवर्म्याचा आरक्षिक व सेनापती सत्यनाग याने स्वत:ला महाराष्ट्रीय असे म्हटले आहे.[६०] या स्तंभलेखातील महाराष्ट्राचा उल्लेख सर्वात प्राचीन ठरतो. ऐहोळी येथील ( विजापूर जिल्हा मलप्रभातीरी ) जितेंद्र मंदिराच्या कोरीव लेखात पंडीत रविकीर्तीकृत प्रशस्ती श्लोक दिले आहेत. त्यातील एका श्लोकात सत्याश्रय पुलकेशीने ९९ हजार गावे असणाऱ्या महाराष्ट्रक नावाने ओळखल्या जाणाऱ्या तिन्ही प्रदेशाचे अधिपत्य मिळविल्याची नोंद आहे.[६१] हा लेख इ.स. ७१२ मधील आहे. चालुक्य सम्राट पुलकेशी दुसऱ्याच्या ऐहोळी येथील शिलालेखात त्याने तीन महाराष्ट्र ( विदर्भ, मध्य महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र ) जिंकल्याचे म्हटले आहे.[६२] महाराष्ट्रातील पारंपारीक विभाग नद्यांच्या नावावरुन पडलेले होते. उदा. गंगथडी, भीमथडी व नीरथडी. हे तीनही थडी चालूक्य राज्यात होते. गोदावरी नदीच्या खोऱ्यातील प्रदेश गंगथडी या नावाने ओळखला जात

असे. मराठवाड्याचा ८८ टक्के भूभाग गोदावरी नदीच्या खोऱ्यात मोडतो. हाच प्रदेश गंगथडी होय. हाच गंगथडी प्रदेश प्राचीन महाराष्ट्र राज्याचा एक भाग होता.

## १.९ मराठवाड्याचा राजकीय इतिहास :

मराठवाड्याच्या राजकीय इतिहासाची सुरुवात सातवहान राजघराण्यापासून होते. मौर्यानंतर दक्षिण भारतात सातवाहन घराण्याची सत्ता उदयास आली. या घराण्याची राजधानी ओरंगाबाद जिल्ह्यातील पैठण (प्रतिष्ठान, प्रतिष्ठानपुरा) होती. [६३] या घराण्याने इ.स. पूर्व २३० पासून इ.स. २३० पर्यंत म्हणजेच एकुण ४६० वर्ष राज्य केले. दक्षिण भारतात राजकीय स्थैर्य आणि आर्थिक सुबत्ता निर्माण करण्याचे श्रेय सातवाहन घराण्यातील सम्राटानांच द्यावे लागते. उत्तर भारताच्या राजकीय इतिहासात मौर्यांना जे स्थान आहे, तेच स्थान सातवाहनांना दक्षिण भारताच्या इतिहासात आहे. संपूर्ण मराठवाडा नव्हे, तर संपूर्ण दक्षिण भारत सातवाहनांच्या ताब्यात होता. नदीच्या काठावर असणारी पांढऱ्या मातीची उंच टेकाडे हे सातवाहन स्थळाचे खास वैशिष्ट्ये आहे. सातवाहन काळातील पांढऱ्या मातीचे शेत व टेकाडया या भोकरदन पैठण व तेर येथे आढळतात.

सातवाहन काळात पैठणप्रमाणेच भोगवर्धन, तगरपूर व देवपाली ही प्रमुख नगरे आणि प्रसिध्द व्यापारी केंद्रे होती. भोगवर्धन म्हणजेच जालना जिल्ह्यातील तालुक्याचे मुख्यालय असलेले भोकरदन हे शहर आहे, तर तगरपूर हे नगर उस्मानाबाद तालुक्यातील तेरणा नदीच्या काठावर वसलेले आजचे तेर हे खेडेगाव आहे. भोकरदन[६४] आणि तेर[६५] येथे केलेले उत्खनन व त्यामध्ये मिळालेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन या दोन्ही नगराचे प्राचीनत्व सिध्द झालेले आहे. टॉलेमी[६६] याने असा उल्लेख केला आहे की, बैठणच्या

( पैठण ) उत्तर - पूर्वेस असलेले तगर ( तेर ) हे या काळातील प्रमुख नगर व व्यापारी केंद्र होते. शिलाहारांच्या आलेखात[६७] त्यांनी तगरनगरभूपालक, तगरपूरवराधिश्वर व तगरपूरपरमेश्वर या बिरुदावली धारण केल्याचे आढळते. यावरुन तगरपूर म्हणजेच आजचे तेर ही त्यांची मुळ भूमी होती, हे स्पष्ट होते. डॉ. फ्लिट जे एफ. यांनी टॉलेमीने उल्लेखिलेले तगर नगर म्हणजे पैठणच्या दक्षिण - पूर्वेस साधारणपणे ९५ मैल अंतरावर असलेले आणि तेरणा नदीच्या काठावर वसलेले

उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर हे खेडेगाव असल्याचे मान्य केले आहे.[६८] या तेरचाच उल्लेख तगरपूर[६९] व थेर[७०] या नावानेही केलेला आढळतो. पेरिप्लसनेही वर्णन केलेले आढळते की तगर हे दक्षिणबेडसा मधील दोन प्रसिध्द व्यापारी केंद्रापैकी एक असून हे नगर पैठणपासून पूर्वेस दहा दिवसांच्या प्रवासाच्या अंतरावर आहे.[७१] तगर हे आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र होते. ग्रीक, इजिप्त व फिलाडेल्फीया या देशाशी तगरचे व्यापारी संबंध होते असे दिसून येते.

देवपाली हे नगरही या काळातील प्रमुख नगरापैकी एक होते. देवपाली हे नगर म्हणजेच आजचे औरंगाबाद पासून १३ कि.मी. अंतरावर असलेले देवगिरी - दौलताबाद होय.[७२] येथे उत्खननात मिळालेल्या पुरातत्वीय अवशेषावरुन या नगराचे प्राचीनत्व सिध्द झालले आहे. डिसेंबर २००३ पासून पुन्हा दौलताबाद येथे किल्ल्यातील भारतमाता मंदिराच्या जवळ भारतीय पुराततव विभागाने भारतीय पुरातत्व विभागाचे विभागीय अधिकारी डॉ. एस.के. मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली उत्खनन सुरु केले. १२५ मजुर उत्खननाचे काम करीत होते. या उत्खननात हिंदू व जैन संस्कृतीची अनेक स्मारके आढळ्ली. तसेच इ.स. ११८३ ते १२८४ या काळातील यादवकालीन सोन्याची व कास्य नाणी मोगलकालीन अवशेषही उत्खननात मिळाले आहेत. उत्खननात मिळालेल्या अनेक ऐतिहासिक वस्तूंचे वजन २० ते ३० कि. ग्रॅमच्या आसपास आहे. टॉलेमीने दौलताबाद हे नगर दख्खनमधील एक महत्त्वाचे नगर असल्याची नोंद केली आहे.[७३] सातवाहन सम्राटांनी कला व स्थापत्यालाही आश्रय दिला. त्यांनी औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात पितळखोरा येथील डोंगरात एकुण १३ लेणी खोदिवल्या. ह्या सर्व लेणी बौध्द धर्मीय असून ह्यामध्ये ३,१०, १२ व १३ क्रमांकाच्या लेणी चैत्यगृह व बाकीच्या विहार लेणी आहेत. ह्या लेणी दक्षिण भारतातील प्राचीन लेणी आहेत. अजिंठा येथील ८,९, १०,१२,१३ व १५ या क्रमांकाच्या बौध्द लेणीही सातवाहनांनीच खोदविल्या आहेत. सातवाहन काळात येथील लेणी क्रमांक ९ व १० मध्ये चित्रकाम करण्यात आले.

सातवाहनानंतर दक्षिण भारतात वाकाटक वंशाची सत्ता उदयास आली. या वंशाने इ.स. २५० पासून इ.स. ५५० पर्यंत दक्षिण भारतावर राज्य केले. विदर्भात वाकाटकांच्या दोन स्वतंत्र शाखा राज्य करीत होत्या. पहिली शाखा नागपूर जिल्ह्यातील नंदीवर्धन येथे ( इ.स. ३३० पासून

इ.स. ४९० पर्यंत ) राज्य करीत होती. वाकाटकांची ही शाखा जेष्ठ शाखा या नावाने ओळखली जाते. वाकाटकांच्या दुसऱ्या शाखेची राजधानी वत्सगुल्म ( वाशिम ) होती. अजिंठा लेणी क्र. १६ मधील शिलालेखावरुन समजते की, ही वाकाटकांची कनिष्ठ शाखा होती. वाकाटकांच्या काळात नांदेड हे विषय मुख्यालय होते. या विषय मध्ये कंधारचा समावेश होता. याशिवाय याठिकाणी वाकाटक काळातील पुरावशेषही सापडू लागले आहेत. येथे सापडलेले बौध्द विहाराचे शिल्पावशेष वाकाटक कलाशैलीतील आहेत. अजिंठा येथील चैत्यांच्या दर्शनी भागावर असलेली शिल्प आणि कंधार येथे मिळालेली शिल्पे यांच्यात साम्य आहे. मराठवाड्यातील परभणी, औरंगाबाद, नांदेड आणि बीड जिल्ह्याचा प्रदेश वाकाटकांच्या राज्यात मोडत होता.[७४] सर्वसेन या राजाने दिलेल्या एका दानपत्रावरुन समजते की, त्याचे राज्य नांदेड जिल्ह्यातील भूभागावर होते. अजिंठा शिलालेखावरुन विंध्यशक्तीच्या कार्याची माहीती मिळते.[७५] त्याच्या राज्यात खानदेश, दक्षिण वऱ्हाड, पुणे, नासिक व अहमदनगर जिल्हे व जुन्हे हैदराबाद राज्याचा उत्तर भाग हे प्रदेश समाविष्ट होते. डॉ. ए.व्ही. नाईक यांच्या मते, वाकाटक राज्याचा विस्तार हैदराबाद राज्याच्या उत्तर - पश्चिम भागपर्यंत झ् ालेला होता.[७६] म्हणजेच हैदराबाद राज्याचा उत्तर - पश्चिम भाग वाकाटकांच्या राज्यात समाविष्ट होता. वाकाटक काळात अजिंठा येथील लेणी क्रमांक १,२,१६,१७ व १९ चे खोदकाम झाले. लेणी क्रमांक सोळा वाकाटक सम्राट हरिशेण ( इ.स. ४७५-५०० ) याचा सचिव हस्तिभोज याचा पुत्र वराहदेव याने खोदविली. याच लेणीत असलेल्या वाकाटककालीन शिलालेखात त्याचा उल्लेख आढळतो. येथील लेणी क्रमांक १,२,१६ व १७ मध्ये असलेले चित्रकामही वाकाटक काळातीलच आहे. नांदेड जिल्ह्यातील कंधार येथे वाकाटककालीन शिल्प मोठ्या प्रमाणात आढळते. येथे दर्गापूरा भागात हाजीसया मुकदम यांच्या दर्ग्यांच्या समोर एक प्राचीन वास्तू आहे. ही वास्तू प्राचीन बौध्द विहार असून त्यामधील स्तंभावरील शिल्प वाकाटककालीन अजिंठा कला परंपरेतील आहेत.

वाकाटक सम्राट सर्वसेन याचे राज्य विंध्याचल पासून गोदावरी पर्यंत पसरले होते. सर्वसेनानंतर विंध्यसेन सत्तेवर आला. सर्वसेनाच्या वाशिम ताम्रपटावरुन समजते की त्याच्या काळात नंदीतट हे विषय विभागाचे केंद्र होते. याच विषय विभागातील एक गाव त्याने नंदीतटावरील

अग्रहारास दान म्हणून दिलेले होते. नंदीघाट (नंदीतट) हे नगर म्हणजेच आजचे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले नांदेड होय.

वाकाटकाच्या नंतर दक्षिण भारतात बदामीच्या चालुक्याची सत्ता उदयास आली. या चालुक्यांची राजधानी कर्नाटकातील बदामी हे नगर असल्याने हे चालुक्य घराणे बदामीचे चालुक्य या नावाने इतिहासात प्रसिध्द आहे. या चालुक्यांची सत्ता मराठवाड्यावर होती. चालुक्यांच्या शिलाताम्रशासनात नांदेड हे एक शैक्षणिक केंद्र व विद्वानाचे माहेरघर म्हणून उल्लेखिले आहे.

राजघराण्यात पुलकेशी दुसरा हा कर्तबगार राजा होऊन गेला. संपूर्ण दक्षिण भारतावर त्याची सत्ता होती. गोदावरी नदीच्या काठावरच त्याने उत्तर भारतातील सम्राट हर्षवर्धनाचा पराभव केलेला होता. याच चालुक्य सम्राटाची पाषाणात घडविलेली एक मूर्ती कंधार येथे मिळालेली आहे. तसेच याठिकाणी चालुक्य काळात बरीच मूर्तिशिल्प आढळतात. उस्मानाबाद, नांदेड व लातूर या जिल्ह्याचा प्रदेश चालुक्य साम्राज्यात समाविष्ट होता.

बदामीच्या चालूक्यानंतर मराठवाड्यावर राष्ट्रकूट घराण्याने राज्य केले. राष्ट्रकुटांची राजधानी कंधार आणि मान्यखेट होती. कृष्ण तिसरा याने अमोघवर्ष पहिला यानेही लत्तलूरपूरवराधिश्वर असे बिरुद धारण केले होते.[७७] कंधार येथे इ.स. १९५९ मध्ये कृष्ण तिसरा याच्या काळातील एक शिलालेख मिळालेला आहे.[७८] राष्ट्रकूटकाळात येथे २६ हिंदू, ४० जैन ७ बौध्द मंदिरे बांधण्यात आली. मराठवाड्यातील लातूर, वेरुळ व कंधार या राष्ट्रकुटांच्या प्रारंभिक काळातील राजधान्या होत्या. प्रतिष्ठान
( पैठण ) हे तर राष्ट्रकूटांच्या काळातील राजकीय हालचालीचे प्रमुख केंद्र होते. धर्मापूरी, परळी, अंबाजोगाई, धारुर, नांदेड, तेर व उस्मानाबाद ही या काळातील प्रमुख व्यापारी व नागरी केंद्रे होती. उमरगा तालुक्यातील मुरुम हे याकाळात विषयविभागाचे मुख्य केंद्र होते. संपूर्ण मराठवाडा राष्ट्रकूटांच्या राज्यात समाविष्ट होता.

राष्ट्रकूटांच्या सत्तेनंतर दक्षिणेत कल्याणीच्या चालुक्यांची सत्ता स्थापन
झाली. तैल दुसरा हा या राज्याचा संस्थापक असून तो राष्ट्रकुटांचा महासामंत होता. राष्ट्रकुट सम्राट कर्क दुसरा याला युध्दात ठार करुन त्याने राष्ट्रकूटांचे राज्य मिळविले. इ.स. ९७५ पासून इ.स.

११९० पर्यंत या चालुक्य घराण्याची सत्ता दक्षिण भारतावर होती. या राज्याची राजधानी कर्नाटक प्रदेशातील बिदरजवळ असलेले कल्याणी नावाचे नगर होते. नांदेड जिल्ह्याचा बहुतांश भाग याच चालुक्यांच्या साम्राज्यात मोडत होता. याच चालुक्यांच्या राजवटीत कंधार हे त्यांच्या रट्टवंशीय मांडलीकांची राजधानी होती.[७९]

याच काळात नांदेड येथे एक शाळा व त्रैपुरुषदेवाचे मंदिर बांधले. उमरगा तालुक्यातील मुरुम ( मोरंबपूर, मोरंब, मुरंब ) या नगराचा उल्लेख तेथील चालुक्यकालीन शिलालेखात राजधानी म्हणून केलेला आढळतो. याचकाळात मुरुम हे जैन संघाचे मुख्य पीठ होते. येथे अनक जैन मंदिर होती. हेच ठिकाण ऐंशी गावाच्या समुहाचेही मुख्यालय होते. या काळात परळी तालुक्यातील धर्मापूरी येथे राज्याची मुख्य टाकसाळ होती. त्यामुळेच या नगराभोवती भक्कम तटबंदी उभारली होती. या नगराच्या संरक्षणासाठी मल्लराज या विशेष अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात आली होती. कल्याणीच्या चालुक्यानंतर देवगिरीच्या यादवांनी राज्य केले.

यादव वंशातील पहिला ज्ञात होता दृढप्रहारी ( इ.स. ८६० ते ८८०) होय. यादवांच्या प्रारंभीक लेखात व हेमांद्रीच्या वृत्तखंडातील राज प्रशस्तीत त्यांच्या मुळ प्रदेशाचे नाव सेऊणदेश ( खानदेश ) व राजधानीचे नाव सेऊणनगर असे देण्यात आले आहे. प्रारंभीच्या काळात यादव हे राष्ट्रकूटांचे मांडलीक होते. नंतर ते कल्याणीच्या चालुक्यांचे मांडलीक म्हणून राज्य करु लागले. यादव राजे स्वत:ला श्रीकृष्णाचे वंशज मानतात. भिल्लम पाचवा ( इ.स. ११६५-११९३ ) या यादव राजाने कल्याणीच्या चालुक्यांचा पराभव करुन स्वत:ला स्वतंत्र घोषीत केले. त्यामुळेच त्याला यादव घराण्याचे संस्थापक म्हटले जाते. त्याने देवगिरी ( दौलताबाद ) या नगराची स्थापना केली. व त्यास आपल्या राज्याची राजधानी बनविले. याचठिकाणी त्याने इ.स. ११८७ मध्ये दक्षिणेचा सम्राट म्हणून स्वत:चा राज्याभिषेक करुन घेतला. येथून यादवांनी इ.स. १३१८ पर्यंत महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशावर राज्य केले.

कदंब, पांड्य, होयसळ, कलचूरी व यादव हे कल्याणीच्या चालुक्यांचे सामंत राजे होते. चालुक्यांच्या पतनानंतर यादवांनी दख्खनच्या उत्तर भागात आणि पांड्य, कदंब कलचुरी व होयसळ यांनी दक्षिण भागात स्वतंत्र राज्य स्थापन केली. यादवांची राजधानी औरंगाबाद जिल्ह्यातील देवगिरी

म्हणजेच आजचे दौलताबाद हे ठिकाण होते. त्यामुळे मराठवाडा प्रदेश हे यादवांच्या हालचालीचे प्रमुख केंद्र राहीले. यादव काळात कला, स्थापत्य व साहित्याचा विकास झाला. याचकाळात हेमाडपंती नावाची एक स्वतंत्र मंदिरशैली उदयास आली. मराठवाड्यात या शैलीची मंदिरे मोठ्या प्रमाणात आढळतात. परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात चारठाणा येथे ३६५ हेमाडपंती मंदिरे होती. वरंगळचे काकतीय घराणे हे यादवांना समकालीन होते. नांदेड जिल्ह्याचा परिसर काही काळ त्यांच्या ताब्यात होता. प्रारंभी नांदेड व उत्तरार्धात कंधार हे काकतीयांचे केंद्र होते. इ.स. १२९४ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीवर आक्रमण करुन यादवांचा पराभव केला. पुढे १३१८ मध्ये अल्लाउद्दीनचा पुत्र मुबारकशहा याने शंकरदेवानंतर सत्तेवर आलेल्या हरपाळ देवाचा ( रामचंद्र यादवाचा जावई ) पराभव करुन यादवाचे संपूर्ण राज्य आपल्या साम्राज्याला जोडले. आता दक्षिण भारताचा कारभार दिल्ली सुलतानाने नेमलेल्या राज्यपालाकडून पाहिला जाऊ लागला. अशाप्रकारे यादवांच्या पराभवामुळे संपूर्ण मराठवाडा मुस्लिम सत्तेच्या ताब्यात गेला. इ.स. १३२७ मध्ये मुहम्मद तुघलकाने आपल्या राज्याची राजधानी दिल्ली येथून देवगिरी येथे स्थलांतरीत केली. याचवेळी त्याने देवगिरीचे नाव दौलताबाद असे ठेवले.

मुहम्मद तुघलकाच्या काळात दक्षिण भारतात बंडाळ्या सुरु झाल्या. याचवेळी हसनगंगु उर्फ जाफरखानाने मुहम्मद तुघलकाविरुध्द बंड करुन स्वत:ला सुलतान म्हणून इ.स. १३४७ मध्ये घोषित केले. त्याने अल्लाउद्दीन बहमनशहा या नावे राज्य करण्यास प्रारंभ केला. त्याने स्थापन केलेले हे राज्य बहमनी होय. बहमनी सुलतानानी दक्षिणेत १३४७ पासून १५२६ पर्यंत राज्य केले.[८०] या कालखंडात संपूर्ण मराठवाडा त्याच्याच ताब्यात होता. बहमनी राज्याचे विघटन होऊन अहमदनगरची निजामशाही, वऱ्हाडची इमादशाही. बिजापूरची आदिलशाही, बीदरची बरीदशाही व गोवळकोंड्याची कुतुबशाही अशी पाच राज्य उदयास आली. या पाचही राज्यांच्या ताब्यात मराठवाड्याचे विभिन्न प्रदेश होते. तसेच मराठवाड्याचा प्रदेश मिळविण्यासाठी त्यांच्यात सतत संघर्ष होत असत. इ.स. १६०० मध्ये मोगलांनी अहमदनगरच्या निजामशाहीच राज्य जिंकले.[८१] त्यामुळे मोगलांचा दक्षिणेत प्रवेश झाला. प्रथम निजामशाहीच्या ताब्यातील मराठवाड्यातील काही प्रदेश मोगलाच्या ताब्यात आला. मोगलांनी पुढे संपूर्ण दक्षिणेवर ताबा मिळविला. त्यामुळे संपूर्ण

मराठवाड्यावर त्यांची सत्ता स्थापन झाली. मोगलांनी दक्षिण भारताच्या प्रशासकीय सोयीसाठी त्याचे खानदेश, वऱ्हाड, औरंगाबाद, बीदर, विजापूर व हैदराबाद असे सहा सुभे निर्माण केले. औरंगाबादहून दक्षिण सुभ्यांचा राज्यकारभार केला जात असे. मीर कमरुद्दीन उर्फ चिन कुलीज खानहा दक्षिणेचा सुभेदार म्हणून १७१३ मध्ये दक्षिणेत आला.[८२] ह्यानेच ३१ जुलै १७२४ रोजी दक्षिणेत स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याचे घराणे आसिफजाही या नावाने प्रसिध्द आहे. या राज्याची राजधानी हैदराबाद होती.

मराठवाडयावर प्रथम सातवाहन घराण्याने राज्य केले असून सातवाहन घराण्याच्या कारकीर्दीपासूनच मराठवाडयाच्या राजकीय इतिहासाचा प्रारंभ होतो. सातवाहन घराण्यानंतर मराठवाडयावर वाकाटक घराण्यांने राज्य केले असून प्रस्तुत प्रकारणामध्ये मराठवाडयाचा भौगोलिक व ऐतिहासिक आढावा घेण्यात आलेला आहे.थोडक्यात मराठवाडयाला इतिहास व संस्कृतीचा फार मोठा ऐतिहासिक व भौगोलिक वारसा लाभलेला आहे.

# संदर्भ सूची


१. Census Report, Maharashtra State - 2001.

२. Shelke G.C.(Edi.), History of Marathwada rigion from earliest times to 13th century, 1979, p. 3.

३. Deshmukh B.S., Iconography of Hindu Temples in Marathwada, 1987, p. 12.

४. Kate P.V., Marathwada Under the Nizams, 1987, p.1.

५. जोशी महादेवशास्त्री ( संपा. ), भारतीय संस्कृती कोश, खंड-६,१९९२, पृ.७४९,७५०.

६. कठारे अनिल व नगराळे एन.एन. मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.३३.

७. कित्ता, पृ.३२,३३.

८. Yazdani Gulam M. ( Edi.), The Early History of the Deccan.Vol-I, 1960,p.7.

९. Ibid.

१०. दंडवते मि.रा. ( संपा.), श्रीशिवलीलामृत, १९९८, अ.९, श्लो.९१.

११. Pathy T.V., Elura-Art And Culture, 1980, p. 1.

१२. Morwanchikar R.S., The city of the Saitns-Paithan through the ages, 1985. p. 5.

१३. कर्वे चि.ग. व इतर ( संपा.), महाराष्ट्र परिचय, १९५४, पृ.३५,३६.

१४. Sastri Nilakanta, A History of South India, 1976, p. 4.

१५. Day N.L., Geographical Dictonary of Ancient and Medieval India, 1927.

१६. मोरवंचीकर रा.श्री., दक्षिणकाशी पैठण, १९८७, पृ.२.

१७. Sastri Nalakanta, Op.Cit., p. 41.

१८. Ibid

१९. Morwanchikar R.S., Op. Cit.

२०. Ritti & Shelke G.C.( Edi.), Inscriptions from Nanded District, 1968, Introduction, p. XXXVIII.

२१. Thosar H.S., Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Marathwada, 1977, M. University, P. 102.

२२. E.I. Vol-XXI, p. 29.

२३. देव शां.भा., तेर, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, पृ.१.

२४. E.I. Vol-III, pp. 110-113.

२५. I.A. Vol- VI, p. 68.

२६. E.I., Vol-XXXVIII, Part I, pp. 5-22.

२७. कठारे अनिल व नगराळे एन.एन., पूर्वोक्त, पृ.२९.

२८. कित्ता, पृ.३०.

२९. भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, २००१, पृ.५.

३०. काळे भगवान ( संपा.), मराठवाडा काल आणि आज, १९८६, पृ.५१, ५२.

३१. Schoff W.H. (Edi.), Periplus of the Erythrean Se. 1912, p. 43,51,52.

32. Beal Samuel, Travels of Fa-hien and Sung-Ynn, 1964, pp. 139-141.

33. Yazadani G.M. ( Edi. ), Op. Cit., Introduction.

34. Kane P.V., Ancient Geography and Civilization of Maharashtra, (XXIV), pp. 618-655.

35. Mccrindle, Ancient India described by Ptolemy, 1927, p. 79.

36. Morwanchikar R.S., Op.cit., p. 1.

37. Sircar D.C., Studies in the Geography of Ancient and Mediaeval India, 1960, p. 154,58.

38. Thosar H.S., Op. Cit., p. 105.

39. डिसकळकर द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, १९६४, पृ.१२.

40. Law B.C., Historicl Geography of Ancient India, 1954, p. 152.

४१. Sircar D.C., Op. Cit., p. 154.

४२. काळे भगवान ( संपा. ), पूर्वोक्त, पृ.५९.

४३. Law B.C., Op. Cit., p. 142.

४४. काळे भगवान ( संपा. ), पूर्वोक्त.

४५. कित्ता.

४६. Gazetter of India, Maharashtra State, Osmanabad District, 1972, p. 26.

४७. Mccrindle, op. cit., p. 79.

४८. वाजपेयी कृष्णदत्त/अग्रवाल कन्हैयालाल/वाजपेयी संतोष, ऐतिहासिक अभिलेख्र, १९९२, पृ.७५,६९-९४.

४९. मोरवंचीकर रा.श्री., पूर्वोक्त, पृ.१०.

५०. Law B.C., Op. Cit., p. 183.

५१. Ibid

५२. काळे भगवान ( संपा. ), पूर्वोक्त, पृ.६०.

५३. मिराशी वा.वि. ,सोढ्ढल, उदयसुंदरी संशोधन मुक्तावली, पृ.२१.

५४. Rajshekhara, Kavya Mimamassa, p. 53.

५५. Yazadani G.M. ( Edi.), Op. Cit., p. 43.

५६. काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.४७.

५७. Ritti & Shelke, Op.Cit., No. 41.

५८. Law. B.C.,Op. Cit.,

५९. रोडे सोमनाथ, मराठवाड्याचा इतिहास, १९९९, पृ.२७.

६०. शेनोलीकर ह.श्री. व देशपांडे प्र.न., महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, १९७२, पृ.३२,३३.

६१. कित्ता, पृ.३३.

६२. Gupte R.S., The Art and Architecture at Aihole, 1967, p. 4.

६३. Morwanchikar R.S., Op.Cit., p. 1.

६४. Deo S.B. & Gupte R.S., Excavation at Bhokarden,1947.

६५. Chapekar B.N., Exacavation at Ter, 1958.

६६. Mccrindle, Op. Cit., p. 177.

६७. E.I., Vol-III, p. २६९.

६८. Fleet J.F., Tagara, Ter, Journal of royal Asiatic Society Vol-IV, 1901, p. 573.

६९. Ibid

७०. Ibid

७१. Schoff W.H., Op.Cit., pp. 43.

७२. Mate M.S./ Pathy T.V., Daulatabad- A Report, 1992.

७३. Mccrindle, Op.Cit., p. 171.

७४. Kate P.V., Marathwada Under the Nizams, 1967, p. 6.

७५. Gupte R. S./ Mahajan B.D., Ajanta, Ellora and Aurangabad Caves, 1962, p. 48.

७६. Naik A.V., Structural Architecture of the Deccan, , Vol-IX, Nos. 7-12, July 1947, p.193.

७७. E.I., VI, p. 98, 102, 103.

७८. E.I., Vol - XXXV, p. 105.

७९. Annual Report of Indian Epigraphy, 1937, 1-38.Nos. A 20.

८०. कुंटे भ.ग., बहमनी राज्याचा इतिहास, जुलै १९६६, पृ. ४,८.१९८३, पृ. ४६.

८१. कुंटे भ.ग., दिल्लीच्या शहाजहानचा इतिहास, १९६६, पृ. ४, ८.

८२. पगडी सेतुमाधवराव ( अनु. व संपा. ), मोगल दरबारची बातमीपत्रे, खं.२,